## गायीवरून राजकारण

*कत्तलीसाठी गायींचा बाजारपेठेत व्यापार करण्यावर बंदी घालणारे नवीन नियम घटनाबाह्य आणि हिंदू धर्माशीही विसंगत आहेत.*

गायींच्या कत्तलीला प्रतिबंध करणारे सर्वांत कठोर कायदे गुजरात, हिमाचल प्रदेश, राजस्थान, हरयाणा व पंजाब या राज्यांमध्ये आहेत. पश्चिम बंगाल, केरळ, मेघालय, नागालँड व त्रिपुरा या राज्यांनी मात्र गायीच्या कत्तलीवर बंदी घातलेली नाही. ओडिशा, आसाम, आंध्र प्रदेश, तेलंगण व तामीळनाडू या राज्यांमध्ये बंदी आहे पण ती सशर्त स्वरूपाची आहे– पुनरुत्पादनासाठी वा कामासाठी सक्षम नसल्यास गाय व बैल 'कत्तलीसाठी योग्य' ठरतात. गेली तीन वर्षं केंद्रात सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाला (भाजप) याची पक्की जाणीव आहे की, १९८०च्या दशकाच्या अखेरीपासून झालेला त्यांचा लक्षणीय उदय हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आक्रमक हिंदुत्ववादी राष्ट्रवादाच्या सातत्यपूर्ण राजकीय प्रकटीकरणातून झालेला आहे. त्यामुळं आता विविध राज्यांमध्ये सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या भाजपनं केंद्र सरकारद्वारे देशभरात गोहत्येवर बंदी आणण्याचं बेजबाबदार पाऊल उचललं आहे. आधी त्यांना सत्तेची संधी नसलेल्या राज्यांमध्येही या आक्रमक हिंदुत्ववादी कार्यक्रमातून शिरकाव करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. यासाठी सरकारनं 'प्राण्यांविरोधातील क्रौर्याला प्रतिबंध अधिनियम, १९६०' (पुढे फक्त 'अधिनियम')मध्ये सुधारणा केली. नवीन नियमांद्वारे, देशभरातील सर्व बाजारपेठांमध्ये कत्तलीसाठी गायींचा व्यापार करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. भारतात गायीची कत्तल संपुष्टात आणण्याचा हा प्रयत्न आहे.

साहजिकपणे भाजप आणि हा पक्ष सत्तेत असलेली केंद्र व राज्य सरकारं यांच्या पाठिंब्यावर तथाकथित गोरक्षक गायींच्या रक्षणासाठी निराळ्या स्वरूपाचा दहशतवाद माजवू लागले आहेत. मुस्लीम व दलितांविरोधात हिंसाचार आणि धमकावणीचे बेकायदेशीर मार्ग अवलंबण्याच्या हिंदुत्ववादी राजकीय विचारसरणीशी हे सुसंगतच आहे. गायीला इजा करणाऱ्या प्रत्येकाला फाशी देण्याची धमकी छत्तीसगढचे भाजपचे मुख्यमंत्री रमण सिंग यांनी दिली आहे. गायीचे संरक्षण म्हणजे जगाचे अध्यात्मिक व नैतिक अधःपतन रोखणारी कृती असल्याचा दावा गुजरातच्या भाजप मुख्यमंत्र्यांनी केला आहे! भाजपचं सरकार असलेल्या राजस्थानात एप्रिलमध्ये बाजारात विकत घेतलेले बैल वाहून नेणाऱ्या पेहलू खान यांना गोरक्षकांनी जीवघेणी मारहाण केली. राज्य सरकारच्या एका मंत्र्यानं या मारेकऱ्यांचा बचाव करताना पोलिसांना आदेश दिले की, गायीची कत्तल करणाऱ्या सर्वांविरोधात कारवाई करावी. मारहाणीत झालेल्या इजेमुळं अखेर पेहलू खान यांचा मृत्यू झाला. माणसांना गंभीर इजा

करण्यापेक्षा– किंबहुना मानवी हत्येपेक्षाही– गोहत्या हा जास्त गंभीर गुन्हा ठरला आहे!

राज्यघटनेमध्ये धार्मिक आधारावर गायीला संरक्षण पुरवलेलं नाही (शेती व पशुपालनावर विपरित परिणाम होत असेल तर, घटनेतील कलम ४८मधील सूचनात्मक तत्त्वांनुसार गायीच्या कत्तलीला प्रतिबंध करण्यात आला आहे). राज्यघटनेतील या तरतुदीची माहिती असूनही न्यायव्यवस्थेनं गोहत्येवर पूर्ण बंदी घालण्यावर शिक्कामोर्तब केलं, यापूर्वीही २००५मध्ये अशा स्वरूपाच्या आधीच्या तरतुदीवर न्यायालयानं शिक्कामोर्तब केलं होतं. गायी व बैल पुनरुत्पादनासाठी किंवा कामासाठी अकार्यक्षम ठरले, तरी त्यांचं मूत्र व शेण यांचा उपयोग बायोगॅसनिर्मितीसाठी आणि औषधांसाठी होतो, असा दावा करत सात न्यायाधीशांच्या खंडपीठानं या निर्णयाचं समर्थन केलं. वृद्ध, अनुत्पादक गायींना केवळ 'गोमाते'बद्दलच्या आदरापोटी सश्रद्ध हिंदू पाळत राहातात, या धार्मिक बाबीचा प्रभाव या निकालावर पडलेला नाही, असं म्हणता येईल का?

दूध न देणाऱ्या व वजन ओढू न शकणाऱ्या गुरांच्या कत्तलीवर बंदी आणून चारा इत्यादी स्रोतांचा अपव्यय होतो. त्यांना मंद गतीनं मृत्यूच्या वाटेवर चालू देण्यामुळं अनेक लोकांची उपजीविका आणि पौष्टिक अन्न हिरावून घेतलं जातं. दलित, आदिवासी, मुस्लीम, ख्रिस्ती, शीख व अनेक हिंदूंनाही आठवड्यातून एखाद्-दोन वेळा किफायतशीर किंमतीत प्रथिनयुक्त मांस मिळण्याचा मार्गही या बंदीमुळं संपवला गेला आहे. शिवाय, 'अधिनियमा'तील नवीन नियम हे कलम ४८मध्ये नोंदवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमधून निपजलेले नाहीत.

अध्यात्मिक मुक्ती मिळवण्याचं ध्येय साध्य करण्यासाठीच्या विविध श्रद्धा आणि विश्वासांचं मिश्रण असलेला हिंदू धर्म आणि पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी भाजपची हिंदुत्ववादी विचारधारा यांच्यात तफावत आहे. हिंदुत्वाच्या विचारधारेत सर्वंकष राजकीय सत्ता मिळवून हिंदू धर्माचा विशिष्ट साचा देशावर लादण्याचं ध्येय ठेवण्यात आलं आहे. हिंदू धर्माच्या या अर्थाशी सहमत नसलेल्या अनेकांची उपजीविका आणि जीवनमार्ग हिरावून घेण्याचं काम नवीन नियमांनी केलं आहे. त्याच वेळी हिंदू धार्मिक भावनांचा वापर करून घेत बहुसंख्य लोकमत आपल्या बाजूला झुकवता येईल, अशी आशा भाजपला आहे. असं झाल्यास आगामी राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकांमध्ये मतांच्या मुक्त स्पर्धेत भाजपला वरचष्मा राखता येईल.

'अधिनियमा'तील नवीन नियम घटनाबाह्य असल्याचं सांगून त्यांना आव्हान देणारी याचिका न्यायालयात अपरिहार्यपणे दाखल होईल आणि अखेरीस कदाचित हे नियम संपुष्टातही येतील. अशा वेळी, वैदिक संस्कृतीचं महात्म्य पुनर्स्थापित करण्याच्या 'आपल्या' मार्गात न्यायालयं अडथळा आणत असल्याचा कांगावा भाजप बहुसंख्य हिंदू मतदारवर्गासमोर करेल. परंतु, वैदिक किंवा वैदिकोत्तर कालखंडातही गाय पवित्र मानली जात नव्हती, हा मुद्दा कळीचा आहे. गुरांची हत्या आणि गोमांसभक्षण हे मुद्दे तेव्हा नैतिक वा 'कायदेशीर' उल्लंघनाचे मानले जात नव्हते. किंबहुना ख्रिस्तपूर्व १५०० ते ६०० या काळात 'भारता'मध्ये गोमांसभक्षण बऱ्यापैकी सर्रास होतं. अशी वस्तुस्थिती पचवू न शकणाऱ्या हिंदुत्ववाद्यांनी हिंदू धर्माच्या इतिहासातील हा भाग सोयीस्कररित्या पुसून टाकला आहे. वास्तविक, 'अधिनियमा'तील नवीन नियम केवळ घटनाबाह्यच नाहीत, तर हिंदू धर्माशीही विसंगत आहेत.

●

## प्रगतीत घट

*२०१६-१७ आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दोन तिमाह्यांमध्ये प्रगतीचा वेग मंदावला, यावरून निश्चलनीकरणानं हानी झाल्याचं सिद्ध झालं.*

२०१६-१७ आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीमध्ये (ऑक्टोबर-डिसेंबर) सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (जीडीपी: ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) वाढ ७ टक्के होती, तर संपूर्ण आर्थिक वर्षामधील जीडीपीची वाढ ७.१ टक्के होती, अशी आकडेवारी केंद्रीय सांख्यिकी कार्यालयानं (सीएसओ: सेन्ट्रल स्टॅटिस्टिक्स ऑफीस) फेब्रुवारी २०१७मध्ये जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही संधी वापरून निश्चलनीकरणाच्या टीकाकारांचा विविध ठिकाणी उपहास केला. 'हार्वर्डमधून आलेले ते..' अशा शब्दांत त्यांनी निश्चलनीकरणाच्या टीकाकारांना संबोधलं. निश्चलनीकरणामुळं जीडीपीच्या वाढीमध्ये २ टक्क्यांची संभाव्य घट होऊ शकते, असं निरीक्षण मनमोहन सिंग यांनी संसदेत नोंदवलं होतं, त्याचा थेट उल्लेख मोदींनी सार्वजनिक सभांमध्ये केला. शिवाय, निश्चलनीकरणाचे अनौपचारिक अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतील, असं मत मांडणाऱ्या अमर्त्य सेन यांचाही त्यांनी अप्रत्यक्ष संदर्भ दिला. 'त्यांचा खोटेपणा उघड झाला आहे', असं मोदी म्हणाले. निश्चलनीकरणाचे परिणाम जोखण्यासाठी तिसऱ्या तिमाहीतील आकडेवारी पुरेशी नाही, असं सरकारी संख्याशास्त्रज्ञच सांगत असतानाही, मोदींनी आपल्या भाषणांमध्ये सातत्यानं हे उल्लेख केले. त्यानंतर ३१ मे रोजी सीएसओनं प्रसिद्ध केलेल्या अंदाजी आकडेवारीनुसार २०१६-१७ वर्षाच्या तिसऱ्या व चौथ्या तिमाहींमध्ये प्रगती मंदावल्याचं दिसून आलं, त्यामुळं अर्थव्यवस्थेवरील निश्चलनीकरणाच्या विपरित परिणामावर शिक्कामोर्तब झालं आणि मोदींचा 'खोटेपणा' उघडा पडला.

२०१५-१६ या वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीतील आकडेवारीच्या तुलनेत २०१६-१७च्या तिसऱ्या तिमाहीतील प्रगती ०.६ टक्क्यांनी कमी होऊन ६.७ टक्क्यांवर आली. चौथ्या तिमाहीत तर तब्बल ३.१ टक्क्यांची घट झाली आणि २०१५-१६मध्ये या तिमाहीत ८.७ टक्के असलेली वाढ २०१६-१७च्या चौथ्या तिमाहीत ५.६ टक्क्यांवर आली. २०१३-१४ या वर्षाच्या चौथ्या तिमाहीत ५.३ टक्क्यांनी अर्थव्यवस्थेची वाढ नोंदवली गेली होती, तेव्हापासूनचा चौथ्या तिमाहीतला हा सर्वांत कमी वाढीचा दर आहे. २०१३-१४च्या चौथ्या तिमाहीतील ही आकडेवारी सुधारित नाही, त्यामुळं औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी: इंडेक्स ऑफ इंडस्ट्रीयल प्रोडक्शन) आणि घाऊक किंमत निर्देशांक (डब्ल्यूपीआय: होलसेल प्राइस इंडेक्स) यांच्या सुधारित प्रमाणांचा विचार केला, तर हा आकडा आणखी जास्त येईल. म्हणजे २०१६-१७च्या चौथ्या तिमाहीतील वाढीचा दर हा २०११-१२पासूनचा निचांकी आकडा ठरेल. नवीन मालिका २०११-१२पासून सुरू झाली, हे इथं नमूद करायला हवं. आर्थिक वर्षांच्या संदर्भात सकल मूल्यवर्धित (जीव्हीए: ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) वाढ २०१६-१७मध्ये ६.६ टक्के होती, म्हणजे गतवर्षीपेक्षा यातही १.३ टक्क्यांची घट झाली, जी २०१२-१३पासूनची सर्वांत निचांकी ठरते. ताज्या वर्षाची जीडीपी वाढ ७.१ टक्के आहे आणि निव्वळ अप्रत्यक्ष करांच्या रूपात झालेल्या १२.८ टक्क्यांच्या चक्राकार योगदानामुळं ही वाढ जास्त वाटते. जुन्या राष्ट्रीय उत्पन्न मालिकेच्या लेखापालन

पद्धतीनुसार ही वाढ अशी दिसली नसती.

सकल स्थिर भांडवली रचनेद्वारे (जीएफसीएफ: ग्रॉस फिक्स्ड कॅपिटल फॉर्मेशन) मापण्यात आलेल्या स्थिर गुंतवणुकीच्या दरांमध्येही घट झाल्याचं सीएसओच्या ताज्या आकडेवारीनुसार दिसून येतं. सातत्यपूर्ण किंमतींना जीडीपीची जीएफसीएफ टक्केवारी गतवर्षी ३०.९ टक्के होती, ती २०१६-१७ साली २९.५ टक्क्यांपर्यंत खाली आली. गतवर्षीच्या चौथ्या तिमाहीत २८.५ टक्के असलेली जीएफसीएफ टक्केवारी या वर्षीच्या चौथ्या तिमाहीत २५.५ टक्क्यांवर आली. जीएफसीएफमध्ये घट झाल्याचा परिणाम उत्पादनावर, रोजगारावर आणि मध्यमकालीन उत्पन्नावर होईल.

विशेष म्हणजे शेती व सार्वजनिक प्रशासन ही दोन क्षेत्रं वगळता सर्व औद्योगिक क्षेत्रांमध्ये चौथ्या तिमाहीत वाढ कमी झाली. ही दोन क्षेत्रं वगळता इतर सहा क्षेत्रांमधील सरासरी वाढ ३.८ टक्क्यांपर्यंत खाली आली. २०१५-१६ साली चौथ्या तिमाहीतील ही वाढ १०.७ टक्के होती. यामधील दोन वर्षांमधील तोटा सुमारे सात टक्क्यांच्या आसपास आहे. सर्वंकष अर्थानं जीडीपीमधील घट सुमारे १,३५,६०० कोटी रुपये इतकी आहे. बांधकाम क्षेत्रात वाढीच्या दरामध्ये सर्वाधिक घट झाली. २०१५-१६ साली चौथ्या तिमाहीत या क्षेत्रामध्ये ६ टक्क्यांची वाढ झाली होती, तर या वर्षी यात ३.७ टक्क्यांची घट झाली. सर्वाधिक अनौपचारिक रोजगार या क्षेत्रात निर्माण होतो. उत्पादन, व्यापार, हॉटेलं व वाहतूक, आणि वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवांमध्येही अशा प्रकारची तीव्र घट झाली आहे. या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनौपचारिक रोजगार निर्माण होत असतो.

गेल्या दोन तिमाह्यांमध्ये दिसलेली वाढीतील घट हा निश्चलनीकरणाचा तात्पुरता परिणाम आहे आणि मध्यमकालीन स्वरूपात त्याचा परिणाम दिसणार नाही, असा युक्तिवाद केला जाईल. भारतीय अर्थव्यवस्थेचं स्वरूप मूलतः अनौपचारिक स्वरूपाचं आहे, त्यामुळं जीडीपीमधील योगदान मोजताना सीएसओनं वापरलेल्या अंदाजपद्धतीबद्दलच गंभीर प्रश्न निर्माण होतात. उत्पादन व सेवा क्षेत्रांमधील अनौपचारिक घटकांचं जीव्हीए योगदान मोजताना २०११-१२ या पायाभूत वर्षासाठी परिणामकारक श्रम-दानाची पद्धत वापरण्यात आली, आणि त्यानंतर पुढील वर्षांचे जीव्हीए अंदाज बांधण्यासाठी काही सूचक निकषांचा वापर केला गेला. परिणामकारक श्रम-दान पद्धतीसाठी अंदाजी श्रम-दानाच्या व्याप्तीची आणि प्रत्येक औद्योगिक क्षेत्रातील दर कामगारागणिक जमा होणाऱ्या मूल्याचीही आकडेवारी लागते. अशी आकडेवारी केवळ पायाभूत वर्षासाठीच उपलब्ध असते. पुढील वर्षांसाठी ही माहिती जाणून घेण्याचा कोणताच मार्ग नाही. त्यामुळं, निश्चलनीकरणाचा अनौपचारिक क्षेत्रातील रोजगारावर किंवा या क्षेत्रांमधील कामगारांच्या व उद्योगांच्या उत्पन्नावर सूक्ष्म-आर्थिक पातळीवर कोणता परिणाम झाला हे जाणून घेणं शक्य नाही. आयआयपी व डब्ल्यूपीआय यांमधील कल दाखवणारे काही स्थूल-आर्थिक निकष वापरून पुढील वर्षांच्या जीव्हीएचा अंदाज बांधण्यात आला, परंतु त्यातून अनौपचारिक क्षेत्राच्या योगदानाचा खरा अंदाज येत नाही. अर्थात, अनौपचारिक क्षेत्रात रोजगार व उत्पन्न घटले, स्वयंरोजगारात गुंतलेल्या व्यक्तींचं आणि लघु व मध्यम उद्योगांचं उत्पन्नही घटलं; या क्षेत्रात सर्वत्र तणाव निर्माण झाला, याचा प्रचंड प्रमाणातील पुरावा क्षेत्रीय अहवालांवरून मिळतो.

२०११-१२ या वर्षामधील मोजणीनुसार सुमारे ४८ कोटी ४० लाख कामगारांपैकी सुमारे तीन कोटी

कामगार औपचारिक क्षेत्रामध्ये आहेत, तर उर्वरित– म्हणजे ९३ टक्के– अनौपचारिक क्षेत्रात रोजगार करतात. त्यामुळं अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत कुटुंबांचं व उद्योगांचं ग्रहण आणि बचत यांमध्ये घट झाल्याचा मध्यमकालीन परिणाम या क्षेत्रांमध्ये रोजगार असलेल्या लोकांना नक्कीच सहन करावा लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेला, खासकरून अनौपचारिक उद्योगांची आणि उपजीविकेसाठी या क्षेत्रांवर अवलंबून असलेल्या लोकांची गंभीर हानी झाली आहे. वाढीच्या या नवीन आकडेवारीनं मोदी सरकारची गैरसमजुतीला वाव देणारी घोषणाबाजी आणि पोकळ भाषणबाजी उघडी पाडली आहे.●

---

## मातृत्वाचा मान राखण्यासाठी

*मातृत्व लाभांच्या संदर्भातील दोन निरनिराळ्या सरकारी निर्णयांमधून भेदभावाचं सूचन होतं आहे.*

एकीकडं कामगार कायद्यांमधील सुधारणांमुळं सरसकटपणे कामगारांचे अधिकार व कल्याणकारी योजनांमध्ये कपात होते आहे; परंतु, या वर्षाच्या सुरुवातीला मंजूर करण्यात आलेला ‘मातृत्व लाभ (सुधारणा) अधिनियम, २०१७’ मात्र निश्चितपणे स्वागतार्ह आहे. लोकसभेनं मंजूर केलेल्या या अधिनियमामुळं ‘मातृत्व लाभ अधिनियम, १९६१’मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. यातील एका सुधारणेनुसार, दोन हयात बालकांसाठी स्त्रीला २६ आठवड्यांची भरपगारी मातृत्व रजा दिली जाईल. आधी हा कालावधी १२ आठवड्यांचा होता. कायद्यातील हे व असे इतर काही बदल निःसंशयपणे कौतुकास्पद आहेत. परंतु, या लाभांची खरी गरज असलेल्या स्त्रियांना व कुटुंबांना सामावून घेण्याइतके हे बदल व्यापक नाहीत, ही यातील खरी समस्या आहे. शिवाय, समतापूर्ण पालकत्वाच्या दिशेनं जाणाऱ्या मुद्द्यांना यात स्थान देण्यात आलेलं नाही. या सुधारणांचा लाभ प्रत्यक्षात सिद्ध होण्याआधीच केंद्रीय मंत्रिमंडळानं गेल्या महिन्यात ‘मातृत्व लाभ कार्यक्रमा’तही (अधिनियमाशी याचा संबंध नाही) बदल केले आणि मोठ्या प्रमाणात पात्र लाभार्थींना त्यातून वगळले. कायद्यातील सकारात्मक बदलांच्या पार्श्वभूमीवरचा हा निर्णय विरोधाभासी ठरतो. एका हातानं देऊन दुसऱ्या हातानं परत घेण्याचा हा प्रकार आहे. शिवाय, ताज्या बदलांमुळं महिला कामगारांच्या विविध घटकांमध्ये भेदभावही होतो.

सुधारित मातृत्व लाभ अधिनियमामध्ये संघटित क्षेत्रातील अंदाजे १८ लाख महिलांचा विचार करण्यात आला आहे, आणि दहाहून अधिक व्यक्तींना रोजगार देणाऱ्या आस्थापनांना हा कायदा लागू होईल. पन्नासहून अधिक व्यक्तींना वा तीसहून अधिक स्त्रियांना रोजगार पुरवणाऱ्या ठिकाणी कार्यालयातच किंवा पाचशे मीटर त्रिज्येच्या परिसरामध्ये संगोपनालय असणं अनिवार्य करण्यात आलं आहे. संबंधित मातेला दिवसातून चार वेळा या संगोपनालयाला भेट देण्याची परवानगीही देणं बंधनकारक आहे. कामाचं स्वरूप सोयीचं असेल आणि रोजगारदाता इच्छुक असेल, तर नवीन माता पगारी रजा झाल्यानंतर घरातूनही काम करू शकते. सरोगसीद्वारे बालकाला जन्म देत असणाऱ्या माता वा तीन महिन्यांखालील बालक दत्तक घेणाऱ्या स्त्रिया यांनाही १२ आठवड्यांची पगारी रजा घेता येईल. मातृत्वाच्या रजेमुळं बालमृत्यूची जोखीम कमी होते, आणि स्तनपानाच्या सुधारलेल्या दरामुळं बालकाचं पोषण चांगलं होतं, हे जगभरातील संशोधन व अनुभवांच्या आधारे सिद्ध झालेलं आहे.

मातांना तणावातून बाहेर येण्यासाठीही अशी रजा सहाय्यकारी असते.

परंतु, भारतातील महिलांच्या रोजगारासंदर्भातील सामाजिक-आर्थिक प्रश्नांचा विचार करता जवळपास प्रत्येक कौतुकास्पद कल्याणकारी योजनेसोबत काही अंगभूत शंकाही उपस्थित होतात. रोजगारदाते खर्चाचा विचार करून स्त्रियांना रोजगारावर ठेवणंच थांबवतील, ही अशीच एक भीती यातून निर्माण होते. मातृत्व लाभ अधिनियम याला अपवाद असणार नाही. सरकारी अनुदान पूर्णतः वा अंशतः मिळत नाही आणि खाजगी क्षेत्रातील रोजगारदात्यालाच त्यासंबंधीचा 'आर्थिक' ताण सहन करावा लागतो- अशा कल्याणकारी योजनांच्या बाबतीत सर्वसाधारणपणे ही भीती व्यक्त केली जाते. मातृत्व लाभ अधिनियम अंमलबजावणीच्या पातळीवर अपयशी ठरेल किंवा लहान व मध्यम स्वरूपाचे रोजगारदाते स्त्रियांना रोजगारच देणार नाहीत, अशी शंका उपस्थित केली जाते आहे. भारतीय श्रमशक्तीमध्ये सहभागी होणाऱ्या श्रमवयीन महिलांची टक्केवारी २००५पासून १० टक्क्यांनी घटली आहे, असं आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आकडेवारीवरून स्पष्ट होतं. परंतु, संगोपनालय आणि वाढीव पगारी मातृत्व रजा यांमुळं संघटित क्षेत्रातील मध्यम पातळीवरील नोकरदार महिला काम सोडण्यापासून परावृत्त होतील, याकडं आशावादी मंडळी निर्देश करतात.

घरकाम, शेतमजुरी व गृहोद्योगांमध्ये कार्यरत असलेल्या असंघटित क्षेत्रामधील महिला देशातील एकूण महिला श्रमशक्तीचा ९० टक्के ते ९७ टक्के भाग व्यापतात, परंतु मातृत्व लाभ अधिनियमातून त्यांना वगळण्यात आलेलं आहे. केंद्र सरकारच्या पुरुष कर्मचाऱ्यांना १५ दिवसांची पालकत्व रजा मिळते आणि खाजगी क्षेत्रातही धीम्या गतीनं का होईना हे धोरण वाढतं आहे, परंतु अशा प्रकारच्या रजेकडंही सदर कायदा सुधारणेनं दुर्लक्ष केलं आहे. बालकांचं संगोपन ही पूर्णपणे स्त्रीची जबाबदारी आहे, ही पितृसत्ताक वृत्तीच यातून सबळ होते.

मातृत्व लाभ कार्यक्रमाच्या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३१ डिसेंबर २०१६ रोजी दिमाखात असं जाहीर केलं की, गरोदर असलेल्या व स्तनपान देणाऱ्या मातांना दिली जाणारी रक्कम सहा हजार रुपयांपर्यंत वाढवली जाईल. परंतु, या कार्यक्रमांतर्गत देण्यात येणारं हे आर्थिक सहाय्य केवळ पहिल्या हयात बालकासाठीच मर्यादित ठेवण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं अलीकडंच घेतला. वास्तविक, पन्नासहून अधिक जिल्ह्यांमध्ये 'इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजने'अंतर्गत २०१० सालापासूनच हा कार्यक्रम सुरू आहे. काही कार्यकर्त्यांनी निर्देश केल्यानुसार २०१७च्या मातृत्व लाभ अधिनियमाच्या पार्श्वभूमीवर मातृत्व लाभ कार्यक्रम भेदभाव करणारा ठरतो. दोन मुलांचा नियम व विवाहाचं वय या संदर्भातील बंधनं इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेमध्ये घालण्यात आली होती, ती दूर करावीत या मागणीकडंही केंद्रीय मंत्रिमंडळानं लक्ष दिलेलं नाही. असंघटित क्षेत्रातील सर्वांत धोकाग्रस्त महिलांनाही सामावून घेईल अशा रीतीनं सार्वत्रिक व विनाअट मातृत्व हक्क असावा, अशी मागणी होत असताना मातृत्व लाभ कार्यक्रम केवळ पहिल्या बालकापुरता मर्यादित करणं ही कृती प्रतिगामी ठरते.

केवळ भारतातच नव्हे तर प्रगत अर्थव्यवस्थांमध्येही महिलांना मातृत्वाचे लाभ देण्याची कृती दुधारी तलवारीसारखी असते. सर्वसाधारण रोजगाराचे स्वरूप आणि श्रमशक्तीमधील महिलांचा सहभाग यांमुळं ही संदिग्धता निर्माण होते. औपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना विशेष लाभ देत असताना, या तरतुदींमुळं रोजगारासाठी इच्छुक असलेल्या

महिलांच्या मार्गात अडथळे आणले जाणार नाहीत, याचीही खातरजमा करून घेतली पाहिजे. त्याचबरोबर, अनौपचारिक/असंघटित क्षेत्रातील महिलांपर्यंतही हे लाभ पोचवण्याची गरज आहे. ●

## कोळसा घोटाळ्यानं दिलेले धडे

*एका निवृत्त वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यावरील दोष सिद्ध झाल्यामुळं भारतातील कायदा अंमलबजावणी यंत्रणेबाबत काही गंभीर प्रश्न निर्माण होतात.*

कोळसा क्षेत्राचे एका खाजगी कंपनीला बेकायदेशीर वाटप केल्याप्रकरणी कोळसा मंत्रालयाचे माजी सचिव हरीशचंद्र गुप्ता यांना न्यायाधीश भरत पराशर यांनी दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. केंद्रीय अन्वेषण विभागानं (सीबीआय: सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) दाखल केलेल्या गुन्हेगारी खटल्यांची सुनावणी घेण्यासाठी स्थापन झालेल्या विशेष न्यायालयानं २३ मे रोजी दिलेल्या या निकालामुळं प्रशासन यंत्रणेला धक्का बसला. उच्चभ्रू भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस: इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हीस) काही विद्यमान व माजी अधिकाऱ्यांनी या निर्णयावर तीव्र टीका केली आहे. गुप्ता हे अतिशय जागरूक व प्रामाणिक अधिकारी आहेत आणि कोळशाची खाणक्षेत्रे वा भूपट्टे वाटून देण्यासंदर्भातील चुकीच्या सरकारी धोरणांचं पालन केल्याबद्दल त्यांना लक्ष्य केलं जातं आहे, असा दावा या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केला आहे.

आपल्या देशात कायदा-अंमलबजावणीच्या संदर्भातील दोन महत्त्वाच्या बाजू या घटनाक्रमातून समोर आल्या. एक, कायदेशीर तरतुदीमधील संदिग्धतेमुळं निवडीच्या अधिकारांच्या गैरवापराला मोठा अवकाश मिळतो. दोन, कोळसा घोटाळ्यातील फौजदारी कार्यवाही ज्या पद्धतीनं झाली त्याबद्दलही शंका उपस्थित होतात. काही खाजगी कंपन्यांना १९९३ सालापासून देण्यात आलेल्या २१४ कोळसा खाणक्षेत्रांचं वाटप बेकायदेशीर असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं ऑगस्ट २०१४ रोजी जाहीर केलं. परंतु, सरकारी तिजोरी साफ करणाऱ्या व तुरुंगात डांबण्याजोगं काम केलेल्या राजकीय नेत्यांना न्यायव्यवस्थेनं अजूनही दोषी का ठरवलेलं नाही, हा महत्त्वाचा प्रश्न यातून निर्माण होतो. राजकारण्यांशी संगनमत साधून कार्यभाग उरकणारे प्रशासकीय अधिकारी व उद्योगपती यांच्याविरोधात कार्यवाही करताना जो उत्साह सीबीआयसारख्या तपाससंस्था दाखवतात, तसा उत्साह राजकारण्यांविरोधातील तपासामध्ये का दाखवला जात नाहीत, हाही प्रश्न उपस्थित होतो.

खाजगी कंपन्यांना बंदिस्त वापरासाठी कोळसा खाणक्षेत्रांचं बेकायदेशीर वाटप झाल्याचं बरीच वर्षं आधी माहीत झालं होतं. त्यानंतर २०१२ साली महाअभिलेखापालांनी (कॅग: कम्पट्रोलर अँड ऑडिटर जनरल) या प्रक्रियेवर ताशेरे ओढणारा अहवाल सादर केला. अशा वाटपामुळं सरकारी तिजोरीला झालेला तोटा साधार अंदाजानुसार १,८६,००० कोटी रुपये इतका असल्याचं अहवालात म्हटलं होतं. त्यामुळं अशा प्रकारच्या जगातल्या सर्वांत मोठ्या घोटाळ्यांमध्ये कोळसा घोटाळ्याची गणना झाली. (बेकायदेशीर कोळसा खाणक्षेत्रांचं वाटप झालं त्या बहुतांश काळात कोळसा मंत्रालयाची सूत्रं ज्यांच्याकडं होती ते) माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी कोळसा खाणक्षेत्रांचा सार्वजनिक लिलाव करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याचा नियम बनण्यासाठी आठ वर्षांचा कालावधी लागला, हेही आता सर्वज्ञात आहे.

दरम्यानच्या काळात, कोळसा-धारण क्षेत्र कोणत्या कंपनीला मिळावं याचा निर्णय मुख्यत्वे प्रशासकांनी बनलेली चाळणी समिती करत असे. सर्वोच्च न्यायालयानं नमूद केल्यानुसार, ही समिती अपारदर्शक व मनमानी पद्धतीनं कार्यरत होती आणि कायद्याचाही भंग करत होती. गुप्ता नोव्हेंबर २००८मध्ये निवृत्त झाले, त्याच्या आधीची दोन वर्षं ते या चाळणी समितीचे अध्यक्ष होते. या कालावधीमध्ये किमान ४० कोळसा खाणक्षेत्रांचं वाटप झालं. त्यांना दोषी ठरवण्यात आलेलं एक प्रकरण वगळता आणखी दहा प्रकरणांमध्येही त्यांच्यावर सुनावणी सुरू आहे. शिक्षा झालेलं प्रकरण मध्यप्रदेशातील 'कमल स्पाँज स्टील अँड पॉवर लिमिटेड' (केएसएसपीएल) या कंपनीशी संबंधित आहे. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पवनकुमार अहलुवालिया आणि कोळसा मंत्रालयातील दोन माजी प्रशासकीय अधिकारी के. एस. क्रोफा व के. सी. सामरीया यांनाही या प्रकरणात दोषी ठरवण्यात आलं आहे.

कोळसा घोटाळ्यातील अनेक संशयितांच्या बाबतीत कारवाई करताना कायदा अंमलबजावणी यंत्रणा निवडकपणे कार्यरत राहिल्याचं दिसतं. तत्पूर्वी 'भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८'मधील कलम १३(१)(डी)(iii) शी संबंधित गंभीर संदिग्धतेचीही नोंद घ्यायला हवी. लोकसेवकानं 'कोणत्याही सार्वजनिक हिताला वगळून एखाद्या व्यक्तीकडून एखादी मूल्यवान वस्तू वा आर्थिक लाभ घेतला', तर संबंधित लोकसेवक व्यक्ती गुन्हेगारी कृत्यासाठी दोषी ठरू शकते, असं या कलमात म्हटलं आहे. निराळ्या शब्दांत सांगायचं तर- एखाद्या सरकारी अधिकाऱ्याविरोधात कारवाई करताना 'गुन्हेगारी हेतू' सिद्ध करण्याचं किंवा कशाच्यातरी बदल्यात लाभ म्हणून एखादी कृती करण्यात आली आहे हे सिद्ध करण्याचं बंधन सीबीआय वा कुठल्याही इतर कायदा अंमलबजावणी यंत्रणेला असत नाही. हे कलम काढून टाकण्यासंबंधीचा विचारविमर्श सध्या संसदेची एक समिती करते आहे. केएसएसपीएल या कंपनीला कोळसा खाणक्षेत्र देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल गुप्ता यांना दोषी ठरवण्यात आलं असलं, तरी ही त्यांची संभाव्य 'चूक' कोणत्याही गुन्हेगारी हेतूनं झालेली किंवा लाभाच्या अपेक्षेनं झालेलं नव्हती, असा युक्तिवाद गुप्ता व त्यांचे आयएएसमधील समर्थक करत आहेत. परंतु, गुप्ता यांनी तत्कालीन कोळसा मंत्री व माजी पंतप्रधानांना या व्यवहारासंबंधी अंधारात ठेवलं होतं आणि वाटपाबाबत 'अंतिम मंजुरी' मिळवताना त्यांनी पंतप्रधानांना चुकीची माहिती पुरवली, असं न्यायमूर्ती पराशर यांनी म्हटलं आहे. या निकालाविरोधात आता फक्त सर्वोच्च न्यायालयातच याचिका दाखल करता येऊ शकते.

कोळसा घोटाळ्यात नाव गुंतलेल्या राजकीय नेत्यांविरोधात कारवाई करण्यात सीबीआय व न्यायव्यवस्थेला कमी यश का मिळालं, हा यातला कळीचा प्रश्न आहे. या घोटाळ्यात कथितरित्या सहभाग घेतल्याचा आरोप झालेल्या राजकीय नेत्यांमध्ये संतोष बगरोडिया व दसरी नारायण राव हे माजी कोळसा राज्यमंत्री आहेत. तीन वेळा राज्यसभा खासदार राहिलेले काँग्रेस नेते विजय दर्डा (हे 'लोकमत' माध्यमसमूहाचे अध्यक्षही आहेत) आणि त्यांचे बंधू व महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांच्यावरही या प्रकरणात आरोप झालेले आहेत. काँग्रेसचे माजी खासदार व उद्योजक नवीन जिंदाल यांचं प्रकरण तर या संदर्भातील सर्वांत उठून दिसणारं आहे. कोळसा वाटपामध्ये सर्वाधिक लाभ झालेला खाजगी उद्योगसमूह जिंदाल यांच्या मालकीचा आहे, या लाभासाठी जिंदाल यांनी राव यांना लाच दिल्याचा आरोप आहे. याशिवाय

काँग्रेस व भारतीय जनता पक्षाचे इतर काही मुख्य राजकीय नेते, व्यावसायिक व लोकसेवक या घोटाळ्यात गोवले गेलेले आहेत. सीबीआयनं २५ एप्रिल रोजी सीबीआयचे माजी संचालक रणजित सिन्हा यांच्याविरोधातही तक्रार दाखल केली आहे. कोळसा घोटाळ्यातील आरोपी असलेल्या व्यक्तींना खाजगीत भेटून तपासप्रक्रियेवर 'प्रभाव' टाकण्याचा व त्यात 'पळवाट' काढण्याचा प्रयत्न सिन्हा यांनी केल्याचा आरोप आहे.

माजी अर्थमंत्री पी. चिदम्बरम, त्यांचा मुलगा कत्री आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांची मुलगी यांच्याशी संबंधित आवारांवर छापे टाकण्यासाठी सीबीआयचा 'वापर' करून नरेंद्र मोदी सरकार 'राजकीय सूड' उगवत आहे, अशी टीका सध्या केली जाते आहे. अशा वेळी, देशातील सर्वांत मोठा घोटाळा ठरलेल्या कोळसा प्रकरणामधील शक्तिशाली आरोपींविरोधात कारवाई करण्यातही न्यायव्यवस्था व कायदा अंमलबजावणी यंत्रणा निःपक्षपाती असल्याचं सिद्ध होणं महत्त्वाचं आहे. परंतु आत्तापर्यंत तरी अशा निःपक्षपातीपणाचं दर्शन घडवणारी कारवाई झालेली नाही.

●

---

## कडू औषधं

*औषधं देण्याच्या व घेण्याच्या पद्धतीचं नियमन होत नाही तोपर्यंत औषधविक्रीसाठी ई-मंच उपयोगी नाहीत.*

इंटरनेटद्वारे विक्री करणाऱ्या ई-फार्मसींसोबतच सर्व औषधविक्री व्यवहाराचं नियमन करण्यासाठी सरकारनं नियम प्रस्तावित केले आहेत. भारतभरातील किरकोळ विक्री करणाऱ्या केमिस्टांनी याला नकारात्मक प्रतिसाद दिला आणि एक दिवसाचा संपही केला. औषधांची ऑनलाइन विक्री होत असेल, तर ती थांबवावी की त्याचं नियमन करावं? नियमन करायचं असेल तर आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयानं प्रस्तावित केलेल्या ई-मंचांचं काही सहाय्य होईल का? की, त्यामुळं नवीन समस्याच निर्माण होतील?

आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयानं १६ मार्च २०१७ रोजी काढलेल्या सार्वजनिक नोटिशीमध्ये 'देशातील औषधविक्रीच्या नियमनासंदर्भात सार्वजनिक चर्चा' घडवण्याचं आवाहन केलेलं होतं. औषधं व सौंदर्यसाधनं नियमांमध्ये सुधारणा करून ई-मंचाची स्थापना करण्याचा प्रस्ताव या नोटिशीत होता. उत्पादक, साठाकर्ते/घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते (प्रत्यक्षातील दुकानं आणि ई-फार्मसी) आणि अखेर ग्राहक यांना होणाऱ्या औषधांच्या विक्रीचा माग ठेवण्याचं काम हा ई-मंच करेल. या प्रस्तावात नमूद केल्यानुसार सर्व उत्पादकांना, घाऊक विक्रेत्यांना व किरकोळ विक्रेत्यांना या ई-मंचाकडं नोंदणी करावी लागेल. ही नोंदणी केल्याशिवाय फार्मासिस्टांना औषधं विकायची परवानगी मिळणार नाही. मिळालेल्या आणि विक्री केलेल्या सर्व औषधांचा तपशील, डॉक्टरांनी लिहून दिलेल्या प्रत्येक चिठ्ठीचा-प्रिस्क्रिप्शनचा तपशील, हे सर्व तिथं नोंदवणं बंधनकारक आहे. शिवाय, या मंचाचं व्यवस्थापन करण्यासाठी आर्थिक योगदानही त्यांना द्यावं लागेल. ई-फार्मसींना नियमनाशिवाय कामकाज करण्यास आक्षेप घेणाऱ्या केमिस्टांच्या संघटनेनं या ई-मंचाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. भविष्यात या मुद्द्यावर अनिर्णित कालावधीसाठी संपावर जाणार असल्याचा इशाराही संघटनेनं दिला आहे. ई-मंचावर नोंदणी बंधनकारक करण्याला केमिस्टांच्या संघटनेनं आक्षेप घेतला आहे,

त्याचसोबत या प्रक्रियेसाठी लागणारे मानवी व वित्तीय स्त्रोत, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागातील उपलब्धततेविषयीचे प्रश्न- याबाबतही चिंता व्यक्त करण्यात आल्या आहेत.

ई-फार्मसींच्या नियमनाविषयीचा वाद नवा नाही. २०१५ साली आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयानं औषधांच्या ऑनलाइन विक्रीच्या नियमनासंदर्भात अभ्यास करण्यासाठी एक उप-समिती नेमली होती. या समितीनं सप्टेंबर २०१६मध्ये तपशीलवार अहवाल सादर केला. ई-प्रिस्क्रिप्शनांना जोडणाऱ्या संकेतस्थळाद्वारे एका संभाव्य प्रारूपाची सूचना या अहवालात करण्यात आली होती. डॉक्टर, रुग्ण व औषधविक्रीची ऑनलाइन व प्रत्यक्षातील दुकानं यांना ई-प्रिस्क्रिप्शनांद्वारे जोडणारं हे संकेतस्थळ असावं, अशी शिफारस समितीनं केली होती. 'गुणवत्तेचा दर्जा राखणारी योग्य औषधं' उपलब्ध करून देणं, 'ॲन्टी-मायक्रोबायल रेझिस्टन्स कमी करणं' आणि 'इंटरनेटद्वारे औषधांच्या पुरवठ्याचं नियमन करणं'- असे उद्देश सरकारनं अलीकडच्या नोटिशीत नोंदवले आहेत. या मुद्द्यांचा समावेश समितीनं सुचवलेल्या व्यवस्थेतही असणार होता. वास्तविक, ही सार्वजनिक नोटीस मुळात उप-समितीच्या अहवालाचंच मवाळ रूप असल्याचं दिसतं आहे. उत्पादकापासून ग्राहकापर्यंत होणाऱ्या औषधविक्रीचा माग ठेवणं एवढंच काम या नोटिशीत सुचवण्यात आलेल्या ई-मंचाद्वारे होईल.

शिवाय या नोटिशीत काही ढोबळ शब्दयोजना असलेल्या तरतुदीही आहेत: 'सूची एच, एच-वन व एक्स यांमध्ये नमूद नसलेल्या औषधांना सवलत मिळेल... परंतु नोंदणीकृत डॉक्टरांचं प्रिस्क्रिप्शन असेल तरच ही सवलत मिळेल', हा अशा तरतुदीचा एक दाखला आहे. ही तरतूद प्रिस्क्रिप्शनमध्ये नमूद न होणाऱ्या औषधांनाही लागू आहे का? प्रिस्क्रिप्शनमध्ये नमूद न होणाऱ्या व दुकानातून थेट विक्री होणाऱ्या औषधांच्या बाबतीत स्पष्ट भेदच करण्यात आलेला नाही, ही भारतामधील अधिक प्राथमिक स्वरूपाची समस्या आहे. औषध सल्लागार समितीच्या नोव्हेंबर २०१६मध्ये झालेल्या बैठकीमध्ये एका उपसमितीची निर्मिती करण्यात आली. दुकानातून थेट विक्री होणाऱ्या उत्पादनांची विभागणी करून त्यांचं नियमन करण्यासाठी तरतुदींची/मार्गदर्शक तत्त्वांची शिफारस करणं, आणि प्रिस्क्रिप्शनमध्ये नमूद केलेल्या औषधामधील प्रजातीय घटक असलेल्या औषधांचा पुरवठाही फार्मासिस्टांनी करावा यासाठी आवश्यक सुधारणांची शिफारस करणं- ही कामं या उप-समितीकडं देण्यात आली होती.

यातील काही मुद्दे अजूनही अस्पष्ट असल्यामुळं ई-मंचासंबंधीच्या प्रस्तावित नियमांचा पुनर्विचार होण्याची गरज आहे. २०१५ सालच्या उपसमितीच्या शिफारसींचाही गांभीर्यानं विचार करण्याची गरज आहे. तसंही सध्या अस्तित्त्वात असलेले फार्मसी अधिनियम आणि औषधं व सौंदर्यसाधनं अधिनियम यांमधील नियमनांची पूर्ण अंमलबजावणी होतच नाही. गतकाळातही नियमनाच्या अशा प्रयत्नांच्या बाबतीत केमिस्टांची भूमिका विरोधाची राहिलेली आहे. उदाहरणार्थ, प्रिस्क्रिप्शनवरच उपलब्ध होणारी औषधंही भारतात प्रिस्क्रिप्शनशिवाय मिळतात, हे उघड गुपीत आहे. आपल्या देशात स्वतःच्याच मनानं औषधं घेण्याचं प्रमाण मोठं आहे. याचबरोबर, डॉक्टरांकडून अतार्किक पद्धतीनं औषधं लिहून दिलं जाण्याच्या पद्धतीकडंही लक्ष देण्याची गरज आहे. ई-फार्मसींना नियमनाशिवाय कामकाज चालू ठेवण्याची परवानगी देऊ नये, ही मागणी ग्राह्य असेलही; पण त्याचसोबत काहीशा स्वयं-अंमलबजावणीद्वारे विद्यमान नियमन व नियम यांचं पालन केलं जाईल याची खातरजमाही केमिस्ट संघटनेनं करायला हवी.

ई-मंचाची स्थापना करण्याचा निर्णय हे योग्य दिशेनं टाकलेलं पाऊल आहे. हे पाऊल कधी आणि कशा प्रकारे पुढं टाकलं जाणार आहे याचा निर्णय पोकळीत होऊ शकत नाही. आवश्यक पायाभूत रचना आणि संकल्पनात्मक व कायदेशीर स्पष्टता आपल्याकडं अस्तित्त्वात नाहीत, आणि विद्यमान नियमनांची कार्यक्षम अंमलबजावणी होत नाही- या मुद्द्यांकडं दुर्लक्ष करून चालणार नाही. केमिस्टांच्या संघटनेनं निर्देश केल्यानुसार, औषधविक्री आणि इतर क्रयवस्तूंची विक्री यांची तुलना होऊ शकत नाही, कारण औषधविक्रीमध्ये डॉक्टरांचा व फार्मासिस्टांचा हस्तक्षेप गरजेचा असतो, शिवाय यामध्ये गैरवापराची जोखीमही मोठी असते. अखेरीस, ग्राहकाचं जीवन, त्याचं आरोग्य या प्रक्रियेत जोखमीत अडकू शकतं. ●

---

## टीकाकारांची मुस्कटदाबी

*एनडीटीव्हीसारख्या टीकात्मक आवाजांना लक्ष्य करून सरकार विशिष्ट संदेश देऊ पाहातं आहे.*

सर्व सत्ताधीशांना अवतीभवती स्वतःचे भाट असलेले आवडतात. त्यामुळं शासनकार्य जास्त सुकर होतं. फक्त वरून घोषणा केल्या की बाकीचं काम भाटमंडळी स्तुतिसुमनं उधळून करत राहातात. अशा वेळी केवळ कोणी अविचारीच प्रश्न विचारण्याचं धाडस करतात, किंवा काही तर टीकाही करतात. अशा कृतीचे परिणाम काय होतील, हे त्यांना माहीत असतं. ही कल्पित परिस्थिती असल्यासारखं वाटत असलं, तरी भारतीय लोकशाही सध्या या कल्पित अवस्थेच्या जवळ जाऊन पोचली आहे. एकेकाळी चैतन्यशील असलेली आणि काही वेळा तर अरेरावी करणारी दूरचित्रवाणी वृत्तमाध्यमं नरेंद्र मोदी यांच्या तीन वर्षांच्या सत्ताकाळात या नेत्याचं एकसुरात समर्थन करणारी बनली आहेत. सरकारला जो काही थोडाफार विरोध होतो त्याची टिंगल उडवण्याचं काम ही माध्यमं करतात.

त्यामुळं एनडीटीव्हीसारखी वृत्तवाहिनी (तिच्यातही त्रुटी असल्या तरी) वेगळी उठून दिसते. एनडीटीव्हीचे संस्थापक-मालक प्रणोय व राधिका रॉय यांच्या आस्थापनांवर केंद्रीय अन्वेषण विभागानं (सीबीआय) ५ जून रोजी टाकलेले छापे भारतातील माध्यमस्वातंत्र्यांवरचा हल्ला असल्याचं मानावं का, याविषयी आतापर्यंत बराच वाद झडलेला आहे. एनडीटीव्हीच्या आर्थिक व्यवहारांविषयीचा तपास २००९ सालापासून सुरू आहे, परंतु एका खाजगी बँकेशी असलेल्या या वृत्तवाहिनाच्या व्यवहारासंबंधी एका व्यक्तीनं केलेल्या तक्रारीचा तपास करण्यासाठी असे छापे टाकण्याची गरज सीबीआयला भासली, हे विशेष म्हणावं लागेल. शिवाय, छापे टाकण्याची वेळ आणि लक्ष्यस्थानी असलेली वृत्तवाहिनी यांमुळं अपरिहार्यपणे या कृतीच्या हेतूविषयी काही प्रश्न उपस्थित होतात.

विरोधकांना आणि माध्यमांना गप्प करण्यासाठी आधीच्या सरकारांनीही सीबीआयचा वापर केला, हे खरंच आहे, पण विद्यमान सरकार ज्या पद्धतीनं अशी पावलं उचलतं आहे त्यात विशिष्ट रचनासातत्य दिसतं. आपल्या विरोधकांच्या कथित वित्तीय गैरव्यवहारांवर लक्ष केंद्रीत करून सरकार दुहेरी उद्दिष्ट साध्य करू पाहतं : अशा कारवाईद्वारे विरोधकांची नाचक्की होते आणि त्याच वेळी अशा कारवाईची भीती असलेल्या इतर विरोधकांना चापही बसतो. विरोधी पक्षनेते, मानवाधिकार कार्यकर्ते, बिगरसरकारी संस्था वा माध्यमसमूह अशा विविध

घटकांच्या बाबतीत ही पद्धत अवलंबली जाते आहे. माध्यमांच्या बाबतीत ही पद्धत जास्तच परिणामकारक ठरते, कारण आपण फक्त आर्थिक गैरव्यवहाराविषयी तपास करत आहोत असा कांगावा करत सरकारला माध्यमांच्या मालकांविरोधात कारवाई करता येते, आणि त्याच वेळी माध्यमस्वातंत्र्याशी आपली बांधिलकी असल्याचा दावाही सरकार करत राहू शकतं. शिवाय, हे समर्थन लोकांना सहज पटूनही जातं, कारण सरकारवर टीका करणारी माध्यमं अविश्वासार्ह आहेत किंवा खोटारडी आहेत किंवा त्यांचा काही 'सुप्त हेतू' आहे, अशी ठाम श्रद्धा लोकांमध्ये आधीच रुजवण्यात आलेली असते. सीबीआयनं छापे टाकण्याच्या काही दिवस आधी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) प्रवक्त्यानं एनडीटीव्हीबद्दल केलेली विधानं याच स्वरूपाची होती.

माध्यमांच्या उद्योगक्षेत्रातील मालकांवर दबाव आणण्यासोबतच व्यक्तिगत पत्रकारांच्या मनात भीती बसवण्याची कलाही या सरकारला विशेषत्वानं साध्य झालेली आहे. हे छापे टाकण्यात आल्यानंतरच्या दिवशी 'एनडीटीव्ही इंडिया'वरील अतिशय तल्लख कार्यक्रमात रवीश कुमार यांनी नोंदवल्यानुसार, आता राष्ट्रीय राजधानीतल्या आणि इतरही ठिकाणच्या पत्रकारांना स्वतःवर लक्ष ठेवलं जात असल्याची जाणीव आहे आणि ते भयग्रस्त आहेत. पत्रकार टीका करणारे असतील तर त्यांचे माहितीचे स्रोतही कमी केले जातात. सरकारी कामकाजाच्या वार्तांकनासाठी असे स्रोत अत्यावश्यक असतात, पण दिल्ली आणि काही राज्यांच्या राजधान्यांमध्येही सत्तेच्या भोवती भयसावट वाढत चाललं आहे. माध्यमांची मुस्कटदाबी करण्याची ही पद्धत थेट सेन्सॉरशिपइतक्याच परिणामकारकतेनं काम करते.

या पार्श्वभूमीवर सरकारनं एनडीटीव्हीला लक्ष्य केल्यानंतर मोठ्या प्रमाणात रोष उसळेल, अशी अपेक्षा कोणीही केली असती. परंतु, सरकारच्या हेतूंना ओळखून असलेल्यांमध्ये ऐक्य नसल्याचंही आता स्पष्ट झालं आहे. अपवाद वगळता इतर माध्यमसमूहांनी एनडीटीव्हीला पाठिंबा दिलेला नाही, कारण आपणच पुढचं लक्ष्य असू अशी भीती त्यांना वाटते आहे. 'एडीटर्स गिल्ड'सारख्या व्यावसायिक माध्यमांच्या संघटनांनी एनडीटीव्हीला पाठिंबा दिलेला आहे, पण इतर फारसा कुणी यासाठी पुढाकार घेतल्याचं दिसत नाही. सरकारनं एनडीटीव्हीला लक्ष्य करण्यामागील कारण जाणणाऱ्या माध्यमांबाहेरच्या लोकांनीही स्पष्टपणे या वृत्तवाहिनीला पाठिंबा दिलेला नाही, कारण गतकाळात अशा प्रकारचे हल्ले झेलणाऱ्या इतर माध्यमगृहांना या वृत्तवाहिनीनं पाठिंबा दिला नव्हता. शिवाय, महानगरांमधील बड्या वृत्तवाहिन्यांकडं अशा वेळी लक्ष दिलं जातं, परंतु काश्मीर वा ईशान्येसारख्या प्रदेशांमधील छोट्या वर्तमानपत्रांच्या व नियतकालिकांच्या पाठीशी मात्र कठीण प्रसंगी फारसं कोणी उभं राहात नाही, ही जाणीवही आता वाढते आहे. या ठिकाणी सरकारनं एखाद्या माध्यमगृहाला लक्ष्य केलं किंवा तिथल्या ताकदवानांच्या गैरव्यवहारांचा शोध घेणाऱ्या पत्रकारांना मारहाण झाली वा हत्या झाली, तरी त्या विरोधात राष्ट्रीय पातळीवर रोष निर्माण होत नाही. भारतातील माध्यमांचा अवकाश विभागलेला आहे, या विभाजनामुळंच सत्ताधाऱ्यांना या अवकाशाचा वापर करणं सोपं जातं आणि माध्यमांचा वापर अधिकृत प्रचारतंत्राचं साधन म्हणून करता येतो. ही क्लृप्ती वारंवार साधली जाताना आपण पाहतो आहोत.

एनडीटीव्हीवर सीबीआयनं छापे टाकल्यानंतर

**(पान २१ वर पाहा)**

प्रवासात तिथल्या कामगार संघटना आणि लेबर पार्टी यांच्यातील परस्परसंबंधाची भूमिका मोठी आहे. त्याचप्रमाणे भारतातील पक्षबांधणीच्या प्रकारांचाही अभ्यास होण्याची गरज आहे. पक्ष संघटनाच्या बाबतीतील अनेक नवीन बाबी त्यातून उलगडू शकतील. उदा. पक्षांचे फॅन क्लब्ज, कुटुंबकेंद्री पक्ष किंवा कधी कोणत्या पक्षाच्या स्थापनेमागे असलेली बंडखोर संघटना अशी अनेक वैशिष्ट्यं समोर येतील. ही खरं तर भारतीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्यं असली तरी बहुतेक वेळा त्यांच्याकडे विसंगती म्हणूनच पाहिलं जातं. हेच भाजपला लागू आहे.

भाजपच्या बाबतीत स्वतंत्र असूनही एकमेकांशी जैवरीत्या जोडलेलं संघटनांचं प्रचंड जाळं पक्षासाठी संघटनात्मक पाया पुरवण्याचं काम करतं. त्यामुळेच भाजप विरुद्ध इतर पक्ष ही लढत बव्हंशी विषमच ठरणार असं दिसतं. कारण भाजपकडील तगड्या संघटनात्मक आधाराच्या पार्श्वभूमीवर बहुतेक पक्षांचं समाजामध्ये कामचलाऊ संघटनात्मक अस्तित्वदेखील नाही. त्यामुळे जेव्हा निवडणुकीत या पक्षांना फटका बसतो तेव्हा हातावर हात चोळण्याखेरीज किंवा त्यापुढील अधोगती पाहत राहण्याखेरीज त्यांच्या वाट्याला दुसरं काहीही येत नाही. तात्पर्य, विचारांच्या वेगळेपणाइतकंच हे संघटनात्मक वेगळेपण हा भाजपच्या नवोदित वर्चस्वाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

●

अनुवाद : गौरी कानेटकर

---

**(टीकाकारांची मुस्कटदाबी... पान १६ वरून)**

काही लोकांनी इंदिरा गांधी यांनी १९७५ साली लादलेल्या आणीबाणीची आठवण काढली. त्या वेळी इंदिरा यांनी प्रसारमाध्यमांवर पूर्ण सेन्सॉरशिप बसवली होती, तोही संदर्भ या निमित्तानं पुन्हा नोंदवला गेला. आजची परिस्थिती वेगळी असली, तरी गतकाळातून काही धडे भाजपनं घ्यायला हवेत. सेन्सॉरशिप लादल्याची राजकीय किंमत इंदिरा गांधींना मोजावी लागली. सेन्सॉरशिप बसवलेल्या माध्यमांवर इंदिरा यांनी स्वतः विश्वास ठेवला आणि आपल्या धोरणांमुळं गरीबांना किती त्रास झाला आहे याची कल्पनाही त्यांना आली नाही. लोकांचा सरकारच्या धोरणाला पाठिंबा आहे त्यामुळं मार्च १९७७मधील निवडणुकांमधील विजय मिळेलच, अशी हमी गुप्तचर संस्थांनी त्यांना दिली, आणि त्यांनी त्यावर विश्वासही ठेवला. पण त्या निवडणुकांमध्ये इंदिरा गांधींचा मोठा पराभव झाला. गरीबांनी त्यांच्या विरोधात मतदान केलं. यातला उपरोधाचा भाग असा की, इंदिरा गांधींच्या पराभवामुळंच भाजपला केंद्रातील सत्तेत जनता पक्षाचा भाग म्हणून पहिल्यांदा पाऊल टाकता आलं.

आता इतिहासाचं एक वर्तुळ पूर्ण झालं आहे. इंदिरा गांधींप्रमाणे आजचा सत्ताधारी भाजपही 'भाट' बनलेल्या माध्यमांवर विश्वास ठेवतो आहे आणि विरोध करणाऱ्यांची मुस्कटदाबी करू पाहतो आहे. इतिहासातील दाखल्यानुसार अशा वर्तनाची राजकीय किंमत मोजावी लागते. भाटगिरी करणाऱ्या प्रसारमाध्यमांमुळं सत्ताधारी किती गैरसमजुतीमध्ये राहातात, याचाच एक दाखला भाजपशासित राज्यांमधील तीव्र होत चाललेल्या शेतकरी आंदोलनामधून मिळतो आहे.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२७ मे व ३ तसेच १० जूनच्या अंकांतून)